International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.11 No.4 March – April 2024

# भारतीय समाजातील शाळाबाह्य मुले समस्या, कारणे व उपाय

**डॉ. अमितकुमार शंकरराव गागरे**

*सहयोगी प्राध्यापक, स्वामी सहजानंद भारती कॉलेज ऑफ एज्युकेशन, श्रीरामपूर.*

*Corresponding Author – डॉ. अमितकुमार शंकरराव गागरे*

**DOI - 10.5281/zenodo.10872844**

**प्रस्तावना:**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2019 च्या मसुद्यातील शालेय शिक्षण विभाग यामध्ये शाळाबाह्य मुलांची शाळेतील उपस्थिती वाढवण्यासंदर्भात महत्त्वाच्या सुधारणा व शिफारशी सांगितलेल्या आहेत. या धोरणानुसार 2030 पर्यंत विविध उपायोजनांच्या माध्यमातून शालेय पूर्व काळापासून ते माध्यमिक शिक्षणापर्यंत शंभर टक्के Gross Enrollment Ratio साध्य करावयाचा आहे. त्यासाठी माध्यमिक शिक्षणातील शाळाबाह्य विद्यार्थ्यांच्या या समस्येचा नेमका अभ्यास करणे आवश्यक आहे. या विद्यार्थ्यांची शाळाबाह्य होण्याची नेमकी स्थगन व गळतीची कारणे शोधणे गरजेचे आहे.

माध्यमिक शिक्षणात विविध प्रकारच्या समस्या आढळून येतात. कारण आज लाखो कुटुंबातील लाखो विद्यार्थी माध्यमिक शिक्षण घेत आहे. पूर्वी प्रत्येक गावात प्राथमिक शाळा होत्या आज प्रत्येक गावात माध्यमिक शाळा आहेत. शिक्षणाचा प्रस्फोट झाला आहे. वाड्या, वस्त्या व तांडे येथे देखील शिक्षण मिळत आहे. शिक्षणाचा अवाढव्य विस्तार वाढत आहे. तसेच शिक्षणावरील खर्चही वारेमाप वाढतो आहे. शिक्षणाने देशाची प्रगती होते, शिक्षण हे समाज प्रबोधनाचे साधन आहे. माध्यमिक शिक्षण हे तर प्राथमिक शिक्षण व महाविद्यालयीन शिक्षण यांना जोडणारा दुवा आहे. अशा या माध्यमिक शिक्षणामध्ये अधिकाधिक सुधारणा होणे महत्त्वाचे आहे.

आज देशातील ६ ते १४ या वयोगटातील शाळेत जाणे योग्य जवळपास २५ कोटी मुलांपैकी फक्त १५ कोटी मुले शाळेत जातात. ही उपस्थिती जवळजवळ ६० टक्के एवढीच आहे. सन २००२ च्या आकडेवारी नुसार महाराष्ट्रात ६४९१८ प्राथमिक शाळा व त्यातुन १ कोटी २२ लाख ९१ हजार ५२ एवढे विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या शाळांसाठी ३ लाख २० हजार ३८२ प्राथमिक शिक्षक आहेत. तसेच १४ हजार ६३७ माध्यमिक शाळेत २ लाख ३५ हजार एवढे शिक्षक आहेत. तर कनिष्ठ महाविद्यालयात मात्र ४० हजार शिक्षक आहेत. माध्यमिक शाळेत ८३.३२ लाख एवढी विद्यार्थी संख्या आहे. कनिष्ठ महाविद्यालयात १३.४५ लाख विद्यार्थी आहेत.

दिवसेंदिवस अनेक माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालये अनुदानित व विनाअनुदानित

तत्त्वावर निघत आहेत. त्यांची संख्या सुध्दा लक्षणिय आहे. अशा या अवाढव्य विस्ताराच्या माध्यमिक शिक्षणात निरनिराळ्या समस्या दिसून येतात, वर्गाची वाढती संख्या तर कोठे कमी वर्ग हा फरक शहरी व ग्रामीण भागात आढळतो. त्याच प्रमाणे एकाच वर्गातील विद्यार्थ्यांची असमान पातळी असते. देशाची आर्थिक स्थिती सुधारत आहे. जनतेची माध्यमिक शिक्षणाची भूक वाढत आहे. लोकशाही प्रणालीच्या देशाला, विकसनशील देशाला आर्थिक विकासासाठी माध्यमिक शिक्षणाचे संस्कार आवश्यक आहेत. सामान्यज्ञान, भाषिक वाढ, संस्कार या दृष्टिने असमान अशी मुले एकाच वर्गात शिकत असल्याने निरनिराळ्या समस्या जाणवत आहेत. या विद्यार्थ्यांना शिकवायचा अभ्यासक्रम एकच आहे. असमान पातळीवरील विद्यार्थ्यांना हा अभ्यासक्रम कसा शिकवायचा? नेमक्या वेळात कसा पूर्ण करावयाचा? हा यक्षप्रश्न आज शिक्षकांपुढे उभा आहे. त्यामुळे माध्यमिक स्तरावर गळती व स्थगन ह्या समस्या निर्माण झाल्या आहेत.

सुप्रसिध्द शिक्षणतज्ज्ञ जे. पी. नाईक असे म्हणतात की, "आता माध्यमिक शिक्षणात आपण विस्तारापेक्षा गुणवत्तेवर भर दिला पाहिजे, प्राथमिक शिक्षणासारखीच माध्यमिक शिक्षणातही गळती व स्थगिती आहे. इ. ५ वी त प्रवेश घेतलेले किती मुले शालांत परीक्षा पास झाले यावरून माध्यमिक शिक्षणाची गुणवत्ता मोजली जाते. निम्म्याहून अधिक मुले नापास होतात. त्यामुळे मानवी व आर्थिक शक्तीचा अपव्यय (wastage) होतो. मुले शाळाबाह्य होतात. असाच अपव्यय हा गळती व स्थगनामुळे होतो.

**शाळाबाह्य मुले समस्या, कारणे व उपाय:**

१) **गळती) wastage)** - प्राथमिक शाळेत दाखल झालेले विद्यार्थी शालांत परीक्षा देण्यापूर्वी मध्येच कोणत्याही इयत्तेत असतांना शाळा सोडून गेले त्यास विद्यार्थ्यांची गळती झाली असे म्हणतात. अशा ह्यामाध्यमिक शिक्षणातील गळतीचे प्रमाण ग्रामीण भागात अधिक दिसून येते.

२) **स्थगन )Stagnation)** - विद्यार्थी एका वर्गात एका वर्षापेक्षा जास्त काळ म्हणजे २वर्षे ३/ .जर राहिला तर त्यास स्थगन असे म्हणतात स्थगनामुळे गळती होतेभागात मुलींचे ग्रामीण . .आहे गळतीचे प्रमाण अध

**गळती व स्थगनाची कारणे :**

**१) प्राथमिक शाळेतील कच्चा पाया:**

इयत्ता १ ते ४ चे वर्ग पूर्ण करून किंवा ग्रामीण भागात १ ते ७ चे वर्ग पूर्ण करून विद्यार्थी त्या-त्या भागात ५ वी किंवा ८ वीत प्रवेश घेतो. प्राथमिक शाळा जिल्हा परिषद व नगपालिका चालवित असतात. आता खाजगी संस्था ही प्राथमिक शाळा चालवितात. या प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांची इंग्रजी, गणित आणि भाषा याविषयाची प्रगती कमी असते. आता इ. १ ली पासून इंग्रजी हा विषय आहे तरी चांगले इंग्रजीचे दर्जेदार शिक्षक मिळत नाही. त्यामुळे ते विद्यार्थ्यांची चांगली तयारी

करून घेऊ शकत नाही. ही मुले गणित, इंग्रजी, भाषा व सामान्य ज्ञान यात जेमतेम गुण मिळवितात. त्यामुळे त्यांची प्रगती कमी होते. उदा. दिशाज्ञान नसणे, उपदिशा सांगता न येणे, ही मुले पुढे माध्यमिक शाळेत प्रवेश केल्या नंतर इतर मुलांची बरोबरी करू शकत नाही. त्यामुळे ते नापास होतात. त्याच वर्गात राहतात हे स्थगन व २ ते ३ वर्षांनी शाळा सोडून देतात ही गळती होय.

**२) असमान पातळीचे वर्ग:**

२१ व्या शतकात माध्यमिक शिक्षणाचा विस्तार झपाट्याने वाढला आहे. लाखो मुले माध्यमिक शिक्षण घेत आहेत. सर्वच मुले ही सामान्यज्ञान, भाषिक ज्ञान व संस्कार यादृष्टिने असमान विद्यार्थी एकत्र राहतात. यासर्वांना एकच अभ्यासक्रम असतो. वाढत्या ज्ञानाचा विचार करून अभ्यास पूर्ण करण्याचा शिक्षकांपुढे प्रश्न उभा राहतो. सर्व विद्यार्थी एकाच भावाने मोजले जातात. बौध्दिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांना तसेच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना हा अभ्यासक्रम झेपत नाही. त्यामूळे हे आव्हान ते पेलू शकत नाही म्हणून ते त्याच वर्गात राहतात. २/३ वर्षे नापास होतात हे झाले त्यांचे स्थगन. स्थगनामूळे पुढे ते शाळा सोडतात ही झाली गळती.

**३) मोठ्या संख्येचे वर्ग:**

माध्यमिक शाळेत सद्य:स्थितीत एका वर्गात ७० ते ८० विद्यार्थी असतात. वर्ग मोठा असल्यामुळे शिक्षक-शिक्षिका विद्यार्थ्यांना वैयक्तिक मार्गदर्शन करू शकत नाही. दिलेले गृहपाठ तपासता येत नाही. त्यामुळे मार्गदर्शनाचा अभाव त्यामुळे विद्यार्थ्यांना अनेक विषयांबद्दल गोडी वाटत नाही. विषय समजत नाही, वर्ग नियंत्रण राहत नाही. गोंधळाच्या वर्गात चांगल्या प्रकारे अध्ययन-अध्यापन होत नाही. विद्यार्थ्यांना विषय कळत नाही. म्हणून ते वारंवार नापास होऊन शाळा सोडतात.

**४) शाळेत भौतिक साधनांचा अभाव:**

शाळेची इमारत चांगली नसते बऱ्याच माध्यमिक शाळांना क्रीडांगण नसते. शहरातील शाळांचाही यात समजते. असतो. सुसज्ज ग्रंथालय नाही, चांगली प्रयोगशाळा नाही, त्याचा परिणाम विद्यार्थ्यारो मनावर होतो. अध्ययनावर होतो तोच परिणाम गुणवत्तेवर होतो. परिणामी विद्यावा नापास होतात शाळेविषयी नावड निर्माण होते व ते शाळा सोडतात.

**५) कौटुंबिक आर्थिक परिस्थिती:**

विद्यार्थ्यांची कौटुंबिक व आर्थिक परिस्थिती समाधान कारक नसते. ग्रामीण भागात त्यांचे आई-वडिल मजुरी करतात. शहरी भागात निरनिराळी छोटी-मोठी मोलमजुरीची कामे करतात. त्यामुळे त्यांना पालक - वह्या-पुस्तके व गणवेश देऊ शकत नाही. कुटंबाला अर्थाजन करण्यासाठी हातभार - लावतात. त्यामुळे अभ्यासासाठी वेळ मिळत नाही. त्यामुळे त्यांचे मन अभ्यासात रमत नाही. परिणामी ते नापास होतात. त्याच त्याच वर्गात राहतात हे स्थगन होय. व त्यातुन त्यांची गळती होते.

**६) मुलींचे विवाह व घरकाम:**

ग्रामीण भागातील मुलींना आपल्या आईला घरकामात मदत करावी लागते. काही तर मजुरी करणाऱ्या असतात. ग्रामीण भागातील सधन कुटुंबातील मुलींना शेती काम करावे लागते. त्यामुळे त्या मधुन मधुन शाळेत जात नाहीत. त्यामुळे त्यांचा अभ्यास कच्चा राहतो. म्हणून या मुली नापास होतात. तसेच ग्रामीण भागात मुलींचे विवाह शालांत परीक्षेपुर्वीच करून टाकतात. या मुलींना शाळा सोडून द्यावी लागते. त्यातुनच त्यांची गळती होते.

**७) सामाजिक परिसर:**

शहरातील झोपडपट्टीतील मुले व त्यांच्या सभोवतालचा परिसराचा परिणाम हा त्या मुलांवर होत असतो. पालक अशिक्षित, अडाणी, शिक्षणाची गोडी नसणारे त्यामुळे ते ह्या मुलांना मधेच शाळा सोडावी लागते. काही मुले नापास होतात कारण अभ्यासासाठी योग्य जागा व वातावरण नाही. त्याचा परिणाम प्रगती स्थगन व गळतीत होतो.

**८) शाळा व घरातील अंतर :**

शाळा व घर यांतील अंतर जास्त असल्यामुळे दररोज विद्यार्थी शाळेत जाण्यास कंटाळा करतात. विशेषतः ग्रामीण भागात २ ते ३ मैलांच्या परिसरात शाळा असतात. वाहनांची सोय नसल्याने पायपीट करावी लागते. वाहन असले तर पैसे नाही. त्यामुळे दररोज शाळेत जातीलच याची खात्री नाही. मुली पौगंडावस्थेत असल्यामुळे पालक लांब गावी शिक्षणासाठी पाठवत नाही. यामुळे मुले व मुली नापास होतात. त्यामुळे स्थगन होते. स्थगनाचे रूपांतर गळतीत होते.

**९) विद्यार्थ्यांच्या निवासाच्या अपुऱ्या सोयी:**

शहरी व ग्रामीण भागात बरचसे विद्यार्थी वस्तीगृहात राहतात. परंतु या वसतीगृहांमध्ये विद्यार्थ्यांच्या आहाराच्या गैरसोयी निर्माण होतात. निवासाचे ठिकाण चांगले नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांचे मन वसतीगृहात रमत नाही. त्यांचा ओढा घर व गावाकडेच असतो. त्यामुळे ते अभ्यासात कच्चे राहतात. नापास होतात त्यामुळे स्थगन व गळती होते.

**१०) भटक्या व विमुक्त जाती** :

भटक्या व विमुक्त जातीतील लोकांना स्थिरता नाही. 'ज्या गावी भरेल दरा तोच गाव खरा' या उक्ति प्रमाणे ते सतत भटकत असतात. परिणामी ते आपल्या मुलांना शाळेत पाठवू शकत नाही. एखाद्या ठिकाणी ते ५ ते ६ महिने किंवा वर्षभर स्थिर राहिले तर पुढील वर्षी स्थलांतर करतात. परिणामी ते विद्यार्थी नापास होतात. शाळा सोडून देतात. पुढील गावी शाळेत जातीलच याची खात्री नसते. त्याचे पर्यावसान स्थगन व गळतीत होते.

**स्थगन व गळतीवरील उपाय:**

१) आर्थिकदृष्ट्या गरीब विद्यार्थ्यांना प्राथमिक शाळेप्रमाणे वह्या पुस्तके घेण्यासाठी शिष्यवृत्ती व आर्थिक मदत दिली जावी . उदा .या वर्षा पासून महाराष्ट्र शासनाने सर्व विद्यार्थ्यांना मोफत पुस्तके देण्याची घोषणा केलेली आहे.

२) मोठ्या संख्येच्या वर्गात शिक्षकांनी विविध अध्यापन पध्दतींचा वापर करावयास हवा, गुणवत्तेत मागे राहणाऱ्या विद्यार्थ्यांकडे लक्ष पुरविले पाहीजे.

३) काही प्रमाणात अनुसूचित जाती-जमातींच्या मुलांना शिष्यवृत्या व आर्थिक परंतु त्यासाठी आर्थिक .सहाय्य मिळते .निकष लावावयास पाहिजे

४) शाळेत कार्यानुभवासारखे आर्थिक उत्पादन होईल असे व्यवसाय घेतले जावेतत्यातुन . .विद्यार्थ्यांना आर्थिक प्राप्ती होईल

५) शाळेत भौतिक साधनांची सोय करावी . .त्यासाठी शासनाने वेतनेतर अनुदान द्यावे

६) धनिक मंडळी कडून देणग्या घेवून विद्यार्थ्यांच्या गरजा भागवाव्यात . जेणेकरून विद्यार्थ्यांना शाळेची गोडी लागले.

७) ज्या शिक्षकांचा पदवीचा विषय असेल तोच त्यांना अध्यापनास द्यावा.

८) मुलींच्या शिक्षणाबाबत पालकांचे प्रबोधन केले पाहिजेविवाहाचे दुष्परिणाम -बाल . .त्यांना पटवून द्यावेत

९) झोपडपट्टी व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आकर्षण वाटेल अशा सुविधा पुरवाव्यात.

१०) विद्यार्थ्यांना ग्रंथालय, प्रयोगशाळा व क्रीडांगण यांचा वापर करू द्यावा.

११) इवीच्या १० वी व ९ . .विद्यार्थ्यांची रात्र अभ्यासाची सोय करावी

१२) ग्रामीण भागात २ ते ३ मैलांच्या परिसरात शाळा असल्यास निवासाची व सवलतीच्या दरात वहान सोय उपलब्ध करून द्यावी.

१३) भटक्या जातीजमातीसाठी व - आदिवासी भागातून आश्रम शाळा आहेत त्यांची देखभाल चांगल्या प्रकारे करावी.

१४) विद्यार्थ्यांना स्वयम् अध्ययनाची सवय लावावीस्वाध्याय दिले जावे ., अभ्यासिका असावी.

१५) शिक्षकांनी वर्गामध्ये विविध अध्यापन पद्धती अध्यापन तंत्रे तसेच शैक्षणिक साधने यांचा वापर करावा.

१६) शिक्षकांनी अध्ययन अध्यापन प्रक्रिया मनोरंजक सहज सोपी होईल अशा पद्धतीने वर्गातील वातावरण निर्माण करावेशाळेचा . वर्गातील वातावरण विद्यार्थ्यांना ,परिसर आनंददायी वाटेल अशा प्रकारचे असावे.

१७) विद्यार्थ्यांच्या सर्व प्रकारच्या समस्या म्हणजेच शैक्षणिक सामाजिक शारीरिक मानसिक भावनिक यांचा अभ्यास शिक्षकांनी करून त्यानुसार उपाययोजना कराव्यात.

**संदर्भसूची :**

1. शैक्षणिक तत्त्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र कुंडले .बा .म –
2. उद्न्मोमुख भारतीय समाजातील शिक्षण व शिक्षक डॉ हिरा आहेर –
3. शालेय व्यवस्थापन तत्त्वे व प्रात्याक्षिके डॉ ,डॉ सुभाष भालेराव –प्रतिभा शिंदे .प्रा ,शैला कदम
4. उद्न्मोमुख भारतीय समाजातील शिक्षण व शिक्षक .यु .डॉ के –घोरमोडे व सौ कला घोरमोडे
5. शिक्षण व समाज रावसाहेब .ॲड –शिंदे